# फळछाटणी हंगामाचे यंदाचे नियोजन

डॉ. आर. जी. सोमकुंवर



हिरव्या द्राक्ष जातीमध्ये कमी तापमानात पिंक बेरीची समस्या टाळण्यासाठी मण्यात पाणी भरण्यापूर्वी द्राक्ष घडांना पेपर लावून घ्यावेत.



योग्य मात्रेमध्ये हायड्रोजन सायनामाइडचे पेस्टिंग करावे.

द्राक्ष बागेत सध्या फळछाटणीचा हंगाम सुरू होत आहे. यासाठी सुरुवातीला द्राक्ष बागेमध्ये व्यवस्थापनाचा मुद्दा समोर येत आहे. यात द्राक्षवेलीची फळछाटणीच्या वेळी असलेली परिस्थिती चांगल्या प्रतीचे उत्पादन ठरवत असते. या वर्षीच्या वातावरणाचा विचार करता द्राक्ष बागेत जास्त वेळ व जास्त प्रमाणात पाऊस पडला. ही परिस्थिती बऱ्याच भागांमध्ये दिसून आली. यामुळे काडी परिपक्वतेच्या समस्या एकतर येतीलच, अशा वेळी फळछाटणी घेतल्यास बागेमध्ये एकतर गोळी घड निघण्याची किंवा घडाचे रूपांतर बाळीमध्ये होण्याची समस्या अनुभवास येतील. पुढील फळछाटणीनंतर प्री ब्लूम ते फुलोरा या अवस्थेच्या कालावधीमध्ये पुन्हा पाऊस पडल्यास घड कुज व फुलोरा कुज ही समस्याही निर्माण होण्याचा धोका आहे.

जास्त पाऊस झालेल्या काही बागेमध्ये पुढील काळामध्ये थंडीही वाढण्याची शक्यता असेल. अशा वेळी छाटणी केलेल्या बागेमध्ये फुटी मागेपुढे निघतील. जास्त प्रमाणात पाऊस झालेल्या बागेमध्ये मुळांच्या कक्षेतून अन्नद्रव्यांचा लिचिंग (निचरा) झाले असल्यास पुढील काळात द्राक्ष घडाच्या विकासामध्ये अडचणी येण्याची शक्यता अधिक आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी खालील उपाययोजना महत्त्वाच्या असतील.

- फळछाटणीपूर्वी माती परिक्षण करून घेणे महत्त्वाचे असेल.
- काडीची परिपक्वता झालेली नसल्यास फळछाटणी थोडी उशिरा घ्यावा. त्यापूर्वी उपाययोजना कराव्यात.
- फळछाटणी पूर्वी काडी तपासणी फायद्याची ठरेल.
- एक सारख्या फुटी निघण्यासाठी बागेतील तापमान, काडीची जाडी व काडीवरील डोळे किती फुगलेले आहेत, याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यानुसार हायड्रोजन सायनामाइडची मात्रा कमी अधिक करावी.
- बागेत आर्द्रता जास्त वाढलेल्या परिस्थितीमध्ये रोगनियंत्रणाच्या दृष्टीने जैविक नियंत्रण पद्धतीवर जोर द्यावा. ठिबक आणि फवारणीद्वारे यांचा वापर करणे शक्य आहे.
- घडाचा विकास होण्याच्या दृष्टीने मुळे कार्यक्षम असणे गरजेचे असते. यासाठी बोद मोकळे राहून, त्या हवा खेळती राहील यासाठी उपाययोजना कराव्यात.
- कमी तापमानाच्या स्थितीमध्ये हिरव्या द्राक्ष जातीमध्ये पिंक बेरीचा प्रादुर्भाव दिसून येईल. यासाठी मण्यात पाणी उतरण्यापूर्वीच्या अवस्थेत घड पेपरने झाकून घ्यावेत. ही शिफारस फक्त हिरव्या द्राक्ष जातींसाठी आहे.

– डॉ. आर. जी. सोमकुंवर,
९४२२०३२९८८
(संचालक, द्राक्ष संशोधन केंद्र, मांजरी, जि. पुणे)

